




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

दु:खी माणसाला मदत करण्यासाठी
लांबवलेला एक हात
प्रार्थने साठी जोडलेल्या
दोन हातां पेक्षा अधिक उपयुक्त आहे.


वर्ष : ०५ | अंक : ०६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२१ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## लेखी आश्वासनानंतर रविश रासकर यांचे उपोषण स्थगित



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील सुपा जुनी व फेज २- एम आयडीसी परिसरातील निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांच्या कामांबाबत व रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी यासाठी कामगार नेते रविश रासकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह सुरू केलेले बेमुदत उपोषण मऔविम, (एमआयडीसी) विभागाने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर स्थगित केले.

सामाजिक कार्यकर्ते रविश रासकर यांनी सोमवार दि.१८ ऑगस्टपासून नवनागापूर येथिल एमआयडीसी कार्यालयाच्या आवारात बेमुदत उपोषण सुरू केले होते. दुसऱ्या दिवशी या संदर्भात काही अधिकारी उपोषणकर्त्यांशी चर्चा करण्यासाठी आले होते. मात्र समाधानकारक निर्णय न झाल्यामुळे रासकर यांनी उपोषण सुरू ठेवले. दुपारच्या सत्रात संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा झाली व सायंकाळी उशिरा पोलिस अधिकारी शेरकर व प्रशासनाने एमआयडीसी सहायक उपअभियंता अनिल पांढरे यांनी उपोषणकर्ते रविश रासकर यांची भेट घेतली. त्यांनी सुपा जुनी व फेज - २ एमआयडीसी परिसरातील रस्त्यांची कामे हे पुर्ण झाली नसुन ते पावसाळ्यानंतर रस्त्याची कामे अंदाजपत्रकानुसार पुर्ण करण्यात येतील असे लेखी आश्वासन दिले. दोन्ही विषयांसाठी दोन दिवस सुरू असलेले उपोषण मागे घेत असल्याचे रासकर यांनी जाहीर केले. यावेळी प्रविण दळवी, तेजस गायकवाड, यश मिसाळ, दादा शेळके उपस्थित होते.

## वडील बोलले कामधंदा करीत नाही...
## मुलानं पित्याला संपवलं...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, बुलडाणा :** काहीच कामधंदा करीत नाही, ताटात उष्टे अन्न ठेवले असे बोलल्याच्या रागातून संतापलेल्या मुलाने वृद्ध वडिलांची कुऱ्हाडीने घाव घालून हत्या केली. पुरावा नष्ट करण्यासाठी सतरा वर्षीय अल्पवयीन मुलाच्या मदतीने मृतदेह पोतडीत घालून पूर्णा नदीत फेकून दिला. बुलढाण्यातील संग्रामपूर तालुक्यातील बोडखा येथे ही संतापजनक घटना उघडकीस आली. आरोपीला पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्याला पोलिस कोठडी सुनावली आहे. सूनेच्या फियार्दीमुळे हा गुन्हा उघडकीस आला आहे. आठवड्याभरानंतर या घटनेबद्दल सुनेनं फिर्याद दिली. या घटनेतील मृत वडिलांचे नाव रामराव उत्तम तेल्हारकर असून त्यांचे वय ६९ आहे. या प्रकरणी आरोपी मुलगा शिवाजी रामराव तेल्हारकर वय ४० यास पोलिसांकडून अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला २५ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. मृत रामराव हे आरोपी मुलगा शिवाजी, सून आणि नातवासोबत संग्रामपूरातील बोडखा येथे राहत होते. १३ ऑगस्ट रोजी मुलगा घरी जेवणासाठी आला होता. याच सुमारास रामराव यांनी शिवाजीला 'तू घराकडे लक्ष देत नाही. कामधंदा करीत नाही. ताटात उष्टे अन्न का ठेवले' यावरून विचारणा केली. यावर शिवाजी प्रचंड चिडला आणि रागाच्या भरात त्याने वडील रामराव यांच्यावर कुऱ्हाडीने वार करून त्यांची हत्या केली. त्यानंतर त्याने मृतदेहाची विल्हेवाट लावली. यासाठी त्याने त्याने सतरा वर्षीय मुलाची मदत घेतली. मृतदेह एका पोतडीत भरून पूर्णा नदीपात्रात फ ेकून दिला होता.

**सुनेच्या फिर्यादीवरून पती-मुलाविरुद्ध गुन्हा !**

सुनेने १९ ऑगस्ट रोजी घडलेल्या घटनेची फिर्याद तामगाव पोलिसांत दिली. पोलिसांनी मुलगा व नातवाविरुद्ध बीएनएस कलम १०३ (१), २३८ (अ), २३८ (ब), ३ (५) अन्वये गुन्हे दाखल केले. तसेच आरोपी शिवाजी याला तत्काळ अटक केली. संग्रामपूर येथील न्यायालसमोर हजर केले असता आरोपीस सहा दिवसांचा पीसीआर देण्यात आला. या घटनेचा अधिक तपास ठाणेदार राजेंद्र पवार करीत आहेत.

## आम आदमी पार्टी तर्फे वोट चोर, गद्दी छोड़ आंदोलन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२०, नागपूर :** छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, महाल नागपूर येथे आम आदमी पार्टी नागपूर तर्फे शहर सह संघटन मंत्री गिरीश तितरमारे यांच्या नेतृत्वाखाली वोट चोर, गद्दी छोड़ या देशव्यापी आंदोलनाचा एक भाग म्हणून जोरदार नारे निदर्शने करण्यात आले.

अलीकडेच देशभरात वृत्तपत्रे व सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या बातम्यांमधून स्पष्ट झाले आहे की, भारतीय जनता पार्टीने मुख्य निवडणूक आयोगाच्या मदतीने मतदार चोरी करून सत्तेवर कब्जा केला आहे. लोकशाही संपवण्याचे षडयंत्र बीजेपी सरकार आणि मुख्य निवडणूक आयोगाद्वारे रचले जात आहे, असा गंभीर आरोप आंदोलनात करण्यात आला.

मुख्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या अलीकडील पत्रकार परिषदेत विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे न देता विषय टाळला गेला. त्यामुळे आयोगाची भूमिका थेट बीजेपी सरकारच्या मदतीची असल्याचे उघड झाले आहे. जसे ब्रिटिश राजवटीविरुद्ध देशभरात क्रांती करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले गेले, त्याचप्रमाणे आज पुन्हा एकदा लोकशाही वाचवण्यासाठी देशव्यापी आंदोलन उभारणे आवश्यक झाले आहे. संविधानानुसार लोकशाही पद्धतीने देश चालवावा, अशी ठाम भूमिका आम आदमी पार्टीने घेतली आहे.

या आंदोलनात रोशन डोंगरे, सचिन लोणकर, अल्का पोपटकर, शैलेश गजभिये, प्रशांत अहिरराव, जवाद अहमद, जॉय बांगडकर, अंकुश ढोणे, संगीता बाथो, मंजू फोपरे, विना भोयर, इरशाद अली, शाहिस्ता बानो, सुदाम पाल, शशांक वैद्य, शिरीष तिडके, प्रदीप भांडणे, प्रशांत मिशुलकर आदी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# जिल्हा परिषदेतील महिलांनी घेतला लाडकी बहीण योजनेचा लाभ



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, पुणे :** राज्यात महायुतीचं सरकार निवडून येण्यासाठी लाडकी बहीण योजनाचा सर्वधिक फायदा झाला आहे. पण या योजनेबाबत रोज नवनवीन त्रुटी आणि गैरव्यवहार बाहेर येताना आपल्याला पाहायला मिळत आहेत. आता तर चक्क हजारोंपेक्षा जास्त जिल्हा परिषदमधील कार्यरत असलेल्या महिलांनी याचा लाभ घेतला असल्याची बाब उघडकीस आली आहे आणि त्याबद्दल शासन कारवाई करण्याचे निर्देश महिला व बालविकास विभागाने संबंधित अधिकाऱ्याला दिले आहेत. याबद्दलचं पत्र आमच्या हाती लागलेलं आहे. लाडकी बहीण योजने संदर्भात लाभ घेणारे अनेक गैरमंडळी समोर आल्या आहेत. त्यामध्ये पुरुषांचा देखील समावेश आहे. त्यामुळे आता ह्याला कात्री लावण्यासाठी महिला आणि बालविकास विभागाने अंतर्गत चौकशी लावलेली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूम ीवर सरसकट महिलांना दीड हजार रुपये प्रति महिन्यानुसार तीन ते सहा हजार रुपये देण्यात आले होते. मात्र याचा अतिरिक्त भार मंत्रालयामधली दुसऱ्या खात्यांवर पडू लागल्यामुळे लाडकी बहिणी योजनेला कात्री लावण्याचा काम सरकारकडून केलं जात आहे. यामध्ये नवनवीन खुलासे हाती येत आहेत.

लाडकी बहीण योजनेमुळे सामाजिक न्याय विभाग आणि मागासवर्गीय विभागातला निधी देखील वळविण्यात आला होता. यामुळे मंत्रिमंडळात शिंदे गट विरुद्ध अजित पवार गट अशी ही सुरस रंगलेले आपल्याला पाहायला मिळाली होती. परंतु मध्यस्थी करत हा वाद मिटला असताना लाडकी बहीण योजनेवरती काय उपाययोजना करता येईल, याबद्दल देखील अनेक बैठका मंत्रालयात पार पडल्या. त्याला अनुसरून ही कारवाई केली गेलेली आहे.

कारवाईमध्ये म्हणण्यात आलेलं आहे की, सदर पत्रासोबत महिला व बाल विकास विभागाने पाठविलेल्या यादीमध्ये एकूण ११८३ नावे समाविष्ट आहेत. सदरचे अधिकारी/कर्मचारी जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत आहेत. जिल्हा परिषदा स्वायत्त संस्था असून जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे नियुक्ती तथा शिस्तभंग विषयक प्राधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आहेत. त्यामुळे विषयांकीत प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा नियमातंर्गत आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल महिला व बाल विकास विभागास उपलब्ध करुन द्यावी व त्याची प्रत ग्राम विकास विभागास उपलब्ध करुन द्यावी, अशी माहिती प्राप्त झाली आहे.

# टाकळी ढोकेश्वरच्या ४ जणांना पोलिसांनी केली अटक !

## वासुंदे येथे वाळू तस्करीच्या वादातून युवकावर प्राणघातक हल्ला व दरोडा प्रकरण




### रामा तराळसह, झावरे, खिलारी, अल्हाट अटकेत...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** वासुंदे येथे वाळू तस्करीच्या वादातून युवकावर प्राणघातक हल्ला करणाऱ्या मुख्य आरोपीच्या मुस्क्या आवळण्यास पोलिसांना यश आले आहे. मुख्य आरोपी रामा तराळ यासह गणेश संपत झावरे व सिद्धार्थ खिलारीला पोलिसांनी अटक केली. अटक केलेल्या सर्व आरोपींना दुपारी उशीरा न्यायालयात हजर केले जाणार आहे.

पारनेर तालुक्यातील वासुंदे येथे वाळू तस्करीच्या वादातून २४ ऑगस्ट २०२५रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास विशाल तळेकर या युवकावर टाकळी ढोकेश्वर परिसरातील गुंड प्रवृत्तीच्या युवकांनी प्राणघातक हल्ला केला. हल्लेखोरांनी काठी, दांडके आणि गजाचा वापर करून तळेकर यांना गंभीर जखमी केले. या घटनेमुळे परिसरात दहशत पसरली होती. हा हल्ला वाळू तस्करीच्या वादातून घडल्याचे बोलले जात होते.

हल्लूयात सहभागी असलेले टाकळी ढोकेश्वर येथिल उपसरपंच किरण उर्फ रामा किसन तराळ, गणेश संपत झावरे, सिद्धार्थ खिलारी, अमोल अल्हाट आणि मुन्ना अल्हाट हे परिसरात गुन्हेगारी करत असल्याचे समोर आले आहे. हल्लयानंतरही आरोपी दोन दिवस मोकाट फिरत होते. त्यामुळे स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण होते. १५ ऑगस्ट रोजी अमोल अल्हाट याला अटक झाली. परंतु इतर आरोपी परिसरातच फिरत असल्याची माहिती होती. या प्रकरणाचे वृत्त प्रकाशित केल्यानंतर पारनेर पोलिसांनी तातडीने कारवाई करत मुख्य आरोपी किरण उर्फ रामा किसन तराळ याला मंगळवार १९ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी टाकळी ढोकेश्वर येथून अटक केली. टाकळी ढोकेश्वर गावातील मुख्य चौकात हातात बेड्या पडताच रामा तरारळच्या छातीत दुखायला लागले दरोडा आणि मारहाणीचा गुन्हा दाखल झालेल्या मुख्य आरोपी रामा तराळ याला वैद्यकीय तपासणीसाठी पारनेरच्या ग्रामीण रुग्णालयात नेले असता त्याने छातीत दुखत असल्याची तक्रार केली. विशाल तळेकर यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती गंभीर आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा अधिक तपास सुरू केला आहे.

**पारनेरच्या रुग्णालयात मलिदा घेऊन दिले जाते सर्टिफिकेट !**

गेल्या काही महिन्यांत गंभीर गुन्ह्यांमध्ये कोणत्याही आरोपीला अटक केली असता त्यातील बहुतांश जणांना वैद्यकीय उपचाराच्या नावाखाली दाखल करून घेण्यासाठी मोठी रक्कम घेऊन त्या प्रकारचे सर्टिफिकेट पारनेरच्या या रुग्णालयातून देण्यात येत असल्याचे अनेकदा समोर आले आहे. यासाठी एक टोळीच कार्यरत असल्याचेही बोलले जात आहे. येथिल वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी व गेल्या सात आठ महिन्यांत या रुग्णालयाने आशा प्रकारे दिलेल्या दाखल्यांची चौकशी करण्याची मागणी आता नागरिकांमधून होत आहे.

# शिक्षक बँकेच्या निवडणुकीत उधळला समर्थचा वारू !

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२०, मुंबई :** बृहन्मुंबई म हानगरपालिका शिक्षण विभाग सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीची रणधुम ाळी चालू असून यत्रतत्र सर्वत्र समर्थ सहकार परिवर्तन पॅनलचा वारू चौफेर उधळलेला दिसून येत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणुकिची रणधुमाळी चालू असून बँकेच्या स्थापने पासून आता पर्यन्तच्या इतिहासात पहिल्यांदा या निवडणुकीत तीन पॅनल एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. यापूर्वी महापालिका शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या शिक्षक सभा आणि शिक्षक सेना यांच्या दोन पॅनल मध्ये सरळ लढत न व्हायची. बहुसंख्य शिक्षक सभेचे सभासद असल्यामुळे शिक्षक सभेच्या पॅनलचे एकहाती वर्चस्व असायचे. अपवाद फक्त एकदोन वेळाने शिक्षक सेनेला बहुमत मिळाले होते. मागील काळात एकहाती सत्ता असतानाही या प्रस्थापित शिक्षक सभासद व सेना यांच्या पॅनलने बँकेचा अपेक्षित विकास केला नाही. सभासदांच्या हिताचे निर्णय घेतले नाहीत. यामध्ये खास करून दोन जामीनदार पद्धत रद्द करून विना अट व सुलभतेने सभासदांना कर्ज पुरवठा करणे अपेक्षित होते. अनेक सभासदांनी अनेकवेळा याबाबत मागणी करूनही संचालक मंडळ ठोस निर्णय घेऊ शकले नाही. या अन्यायकारक व जुलमी जामीनदार पद्धतीमुळे शिक्षक सभासद कंटाळून बँकेच्या सभासदत्वाचा राजीनामा देऊन इतर पर्याय शोधू लागले. पर्यायाने बँकेची सभासद संख्या घटली. आणि कधीकाळी साडेदहा हजार सभासद असलेल्या बँकेत केवळ साडेचार हजार सभासद उरले आहेत.




महापालिका शाळांमध्ये एकसंध असलेल्या समर्थ कामगार युनियनने याच संधीचा फायदा घेत तरुण तडफदार अनुभवी उमेदवारांचे एक समतोल पॅनल या निवडणूकित उभे करून प्रस्थापित दोन्हीही पॅनलला तगडे आव्हान दिले आहे. नव्वद वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच ही निवडणूक इतक्या अटीटतीची व शर्थिची होत आहे.

समर्थ सहकार परिवर्तन पॅनल ने मुंबई महानगरपलिका शिक्षण विभागात अल्पावधीतच आपल्या कामाच्या माध्यम ातून दबदबा निर्माण केला असून बँकेत समर्थ पॅनलला निवडून दिल्यास शिक्षकांचे बँकेबाबतचे सर्व प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिले आहे.

या पॅनलला मागासवर्गीय शिक्षक संघटना, उर्दू शिक्षक संघटना,श्रमजीवी कामगार संघटना, आणि राष्ट्रवादी शिक्षक संघटना अशा चार संघटनानी जाहीर पाठींबा दिल्यामुळे सध्यातरी समर्थ पॅनलचे पारडे जड वाटत आहे. ही निवडणूक येत्या २३ तारखेला होत असून शेवटपर्यंत समर्थ पॅनलचीच हवा असेल आणि विजयाचा गुलाल ही आमचाच असेल असा समर्थ पॅनलचे प्रमुख बबन बोरकर, सरचिटणीस ऋशिकांत घोसाळकर, दिपक झाडे, राजेंद्र पवार, अमोल देशमुख, प्रभाकर हजारे, भगवान भुसारा, पंजाब साबळे, प्रसाद फर्डे, विजय सुरडकर, उज्वला कोंडा, निकिता राजवाडकर यांच्यासह सर्व उमेदवारांनी विश्वास व्यक्त केला आहे.

## संपादकीय



## उद्योजक गुजरातकडे का निघाले?

अंबरनाथच्या आनंद नगर एमआयडीसीमधील उद्योजकांनी अलीकडेच, 'आम्हाला गुजरात, तेलंगणमध्ये स्थलांतरित होणे भाग पडेल', असा इशारा दिला. वसई-विरार पट्ट्यातील उद्योजकांनीही वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे गुजरातला स्थलांतराचाच इरादा बोलून दाखवला होता. इतकेच काय, तीन उद्योजक वापीला गेल्याचेही त्यांनी सांगितले होते.

अंबरनाथच्या उद्योजकांनी स्थानिक स्तरावरील समस्यांचा पाढा वाचला. त्यासाठी त्यांना स्थानिकांचा रोष पत्करावा लागला. त्यासाठी दिलगिरी व्यक्त करावी लागली. पण त्यामुळे मूळ प्रश्न सुटत नाही. हे सर्व बहुसंख्येने मराठी असलेले उद्योजक गुजरात किंवा तेलंगण, कर्नाटकमध्ये जाण्याचे नाव का घेत आहेत? राज्यकर्त्यांनी या प्रश्नाच्या खोलात जाण्याची गरज आहे.

लाल किल्ल्यावरून पंतप्रधानांनी आत्मनिर्भर होण्याचे आवाहन केले. आत्मनिर्भरतेत सूक्ष्म, मध्यम व लघुउद्योगांचे योगदान मोठे असते. इस्रोच्या उपग्रहांपासून ते विमान व युद्धनौकांच्या सुट्या भागांपर्यंत आणि रसायने-औषधांपर्यंत अनेक वस्तू एमआयडीसीमधील लघुउद्योगांमध्ये तयार होत असतात. ठाणे, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, रबाळे, भिवंडी, वाडा, तळोजा, वसई-विरार, पाताळगंगा, महाड अशा भागांमध्ये एम आयडीसी व औद्योगिक संकुले आहेत. गेल्या काही वर्षांत येथील उद्योजक मेटाकुटीस आले आहेत. एक मुख्य प्रश्न अखंडित वीजपुरवठ्याचा आहे. भूमिगत वीजवाहिन्या नसल्याने वारंवार समस्या उद्भवतात. काही उत्पादनांसाठी सलग चार-पाच तास तरी वीजपुरवठा गरजेचा असतो. वीपुरवठा खंडित झाल्यास मध्येच उत्पादन थांबते. निर्यातीसाठी डिलिव्हरीची वेळ गाठणे कठीण होऊन बसते. अनेक उद्योगसंकुलांपर्यंतच्या रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे. ज्या एमआयडीसी संकुलात उद्योजकांसाठी भूखंड नव्याने विक्रीस काढले, ते कागदावर पदरात पडूनही प्रत्यक्ष ताबा मिळण्यास विलंब लागतो.

अंबरनाथच्या पाले एमआयडीसीतील एका उद्योजकाचा या संदर्भात आलेला अनुभव विदीर्ण करणारा आहे. भूखंड अलॉट झाल्यामुळे या उद्योजकाचे बँकेचे कर्ज व त्यावरील व्याजभरणा सुरू झाला. तो काही कोटींच्या घरात गेला. हा भूखंड एका परदेशी कंपनीला दिल्याचे काही महिन्यांनी त्यांना सांगण्यात आले. जो पर्यायी भूखंड दिला, त्याच्या समतलीकरणासाठी दीड-दोन कोटी खर्च आला. इतके झाल्यानंतर देखील हा उद्योजक येथे थांबेल, अशी अपेक्षा करावी काय? भूखंडविक्रीत दलाल बोकाळले असून, तिप्पट-चौपट दराने भूखंडविक्री सुरू असल्याचे उद्योजक सांगतात. स्थानिक मध्यस्थ व राजकीय कार्यकर्त्यांकडून होणारा धाकदपटशा, बिदागीची वसुली अशा अनेक समस्या आहेत. केवळ संघटनाकौशल्याच्या ताकदीवर आज या उद्योजकांना जेरीस आणले जात असून प्रत्यक्ष स्थानिकांचे आयुष्य तरी त्यामुळे खरोखरी सुधारते आहे का, हा कळीचा प्रश्न आहे. एखादे बांधकाम काढल्यास सामग्री कुणाकडून घ्यायची, ट्रक उभे करण्याचे किती पैसे द्यायचे, कुंपणासाठी एकेका पोलमागे किती पैसे द्यायचे, मटेरिअल कुणी टाकायचे या सगळ्यासाठी गटबाजी, माफियागिरी फोफावली आहे. यात स्थानिक राजकारणीच 'बॉस' असल्याने पोलिस ठाण्यांपासून इतरत्र तक्रारींची तड लागणार कशी? या प्रश्नांना सामोरे जाण्याची सर्वांनाच भीती वाटते. परंतु, यामुळे मराठी माणसाचे नाव खराब होत आहे, याची कोणत्याही राजकीय पक्षाला फिकीर नाही.

सार्वजनिक बांधकाम खाते, महावितरण, एम आयडीसी, पोलिस, महापालिका, अग्निशमन दल यांच्या स्तरावरचे प्रश्न कधी धडपणे सुटत नाहीत. अर्थात, सर्वच उद्योजक काही साधेसुधे नसतात. प्रदूषके किंवा रसायने नदीत सोडणे, अग्निशम नाचे नियम धाब्यावर बसविणे अशा पळवाटा शोधणारेही कमी नाहीत. त्यांच्यावर यंत्रणांचा अंकुश का नाही? आत्मनिर्भरता आणायची, स्टार्ट-अपना बळ द्यायचे, तर उद्योजकांना पुरेशा पायाभूत सुविधा द्यायला हव्यात. मुंबई महानगर क्षेत्रातील उद्योजकांना गुजरातची स्वप्ने वारंवार पडणे, चांगले लक्षण नव्हे

# आशिया करंडकासाठी संतुलित संघ निवड

पुढील महिन्यात ९ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत दुबई येथे टी २० सामन्यांची आशिया करंडक स्पर्धा होणार असून या स्पर्धे साठी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी १९ तारखेला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली.

आशिया करंडक स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज सूर्यकुमार यादव हा करेल तर कसोटीतील भारतीय संघाचा युवा कर्णधार शुभमन गिल हा या संघाचा उपकर्णधार आहे. या भारतीय संघाच्या डावाची सुरुवात संजू सॅमसन व युवा अभिषेक शर्मा हे करतील. संजू अनुभवी तर अभिषेक युवा खेळाडू आहे. संजू आणि अभिषेक हे भारताचे अनुभवी आणि युवा खेळाडू भारताच्या डावाची धडेकबाज सुरवात करतील यात शंका नाही. यांच्यासोबत तिसरा सलामीवीर म्हणून शुभमन गिलची निवड करण्यात आलेली आहे. शुभमन गिल तिसऱ्या क्रमांकावरही खेळू शकतो. मधल्या फळीची जबाबदारी कर्णधार सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा आणि रिंकू सिंग यांच्यावर आहे. संजू सॅमसन हा सलामीवर यष्टिरक्षणही करेल. तो भारताच्या पहिल्या पसंतीचा यष्टिरक्षक आहे. जितेश शर्मा याची अतिरिक्त यष्टीरक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे तो उत्तम फिनिशर म्हणूनही आपली जबाबदारी पाडू शकेल. भारताची फलंदाजी अतिशय बलवान असून संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल हे पहिल्या तीन क्रमांकाचे फलंदाज जगातील सर्वोत्तम फलंदाज मानले जातात. टी २० साम न्यात या तिघांची कामगिरी उत्तम असून तिघेही टी २० सामन्यातील श्रेष्ठ फलंदाज समजले जातात. स्थानिक क्रिकेट असो की आयपीएल किंवा आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेट या तिघांची कामगिरी त्यांच्या लैकिकास साजेशी झालेली आहे त्यामुळे त्यांच्या निवडीवर कोणीही प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकत नाही. त्यांची निवड भारतासाठी सुचिन्ह आहे त्यांनी जर चांगली सुरुवात केली तर भारताचे निम्मे काम फत्ते होईल. टी २० सामन्यात धडाकेबाज सुरुवात होणे महत्वाची आहे आणि हे तिघेही धडाकेबाज खेळीसाठी प्रसिद्ध आहे. चौथ्या क्रमांकावर युवा तिलक वर्मा येईल तो भारताचा भरवशाचा फलंदाज असून मिळालेल्या संधीचे सोने कसे करायचे हे त्याला चांगले ठाऊक आहे. तो फ्लॉप गेला




तर त्याची जागा रिंकू सिंग घेईल. तो मैदानात सर्वत्र फटकेबाजी करू शकतो. तोही भारताचा भरवशाचा फलंदाज मानला जातो. त्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव हा धडाकेबाज फलंदाज मैदानात येईल. तो स्फोटक फलंदाज असून मॅच फिनिशर आहेत. कमी चेंडूत जास्त धावा काढून संघाला विजय मिळवून देण्यात त्याचा हातखंडा आहे. त्यानंतर हार्दिक पांड्या हा जगातील सध्याचा सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू येईल. तो गोलंदाजी, तडाखेबंद फलंदाजी आणि प्रभावी क्षेत्ररक्षण करून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावतो. त्याने आपल्या अष्टपैलू खेळीने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. शिवम दुबे हा आणखी एक अष्टपैलू खेळाडू भारतीय संघात आहे. मध्यमगती गोलंदाजी आणि तडाखेबंद फलंदाजी हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. गोलंदाजीमध्ये निवड समितीने तीन फिरकी गोलंदाजांना संधी दिली असून अनुभवी अक्षर पटेल सोबत फॉर्मात असलेला चायनामन गोलंदाज कुलदीप यादव आणि ऑफ स्पिनर वरुण चक्रवर्ती यांना संधी मिळाली आहे. कुलदीप आणि अक्षर दोघेही डावखुरे मंदगती गोलंदाज आहेत मात्र त्यांच्यात विविधता आहे.



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

अक्षर पटेल अर्थोडॉक्स स्पिनर आहे तर कुलदीप चायनमन गोलंदाज आहे त्यामुळे जरी ते डावखुरे असले तरी त्यांच्यात विविधता आहे. आणि दोघेही चांगल्या फॉर्ममध्ये आहे अक्षर पटेल हा भारताचा सर्वोत्तम मंदगती गोलंदाज आहे शिवाय तो फलंदाजीही करतो आणि चांगला क्षेत्ररक्षक आहे म्हणजे तो एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आहे. वरुण चक्रवर्ती हा मिस्ट्री गोलंदाज भारतीय संघात आहे. त्यांची ऑफस्पिन भल्या भल्या फलंदाजाला बुचकळ्यात टाकते. तो जबरदस्त फॉर्मात आहे. भारताला चॅम्पियन ट्रॉफी जिंकून देण्यात त्याचे मोलाचे योगदान होते. आताही त्याने तसेच योगदान दिले तर भारत आशिया करंडकावर पुन्हा एकदा नाव कोरू शकतो. जसप्रीत बुमराह व अर्शदीप सिंग या अनुभवी वेगवान गोलंदाजांसोबत हर्षित राणा या युवा गोलंदाजाला देखील निवड समितीने संधी दिली आहे. निवड समितीने अर्शदीप सिंग या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला संधी देऊन वेगवान गोलंदाजीत विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे. मर्यादित षटकांच्या सामन्यात डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाचे महत्व अनन्यसाधारण आहे. २०११ साली झहीर खान या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने अप्रतिम कामगिरी करून भारताला विश्वचषक मिळवून दिला होता इतकेच नाही तर मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेत अर्शदीप सिंगनेच सर्वाधिक बळी मिळवले होते. डावाच्या शेवटी म्हणजे डेथ ओव्हरमध्ये अर्शदिप सिंगची गोलंदाजी प्रभावी ठरते. निवड समितीने निवडलेला हा संघ चांगला आहे. जुन्या आणि नव्या खेळाडूंना संधी देत जोश आणि होश यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही ठरले आहेत. श्रेयस अय्यर, यशस्वी जयस्वाल आणि मोहम्मद सिराज या अनुभवी खेळाडूंची निवड न झाल्याचे दुःखही आहे. मात्र निवड समिती फक्त १५ सदस्यांचा संघ निवडू शकते त्यामुळे इच्छा असूनही निवड समितीला या खेळाडूंना या संघात निवडता आले नसेल मात्र भविष्यात त्यांना नक्की संधी मिळेल. त्यामुळे त्यांनी नाउमेद होऊ नये. आशिया करंडकासाठी निवडण्यात आलेला हा संघ संतुलित आहे हे मान्य करून नीवड समितीचे याबाबत अभिनंदन करावे लागेल. आता जबाबदारी आहे ती निवडण्यात आलेल्या या १५ खेळाडूंची. या १५ खेळाडूंनी आपल्याला मिळालेल्या संधीचे सोने करून आशिया करंडकावर पुन्हा भारताचे कोरावे. आशिया करंडकावर भारताचे नाव कोरण्यासाठी हे खेळाडू जीवाचे रान करतील आणि १४५ कोटी भारतीयांना आशिया करंडक जिंकून देतील यात शंका नाही.

या स्पर्धेसाठी निवड झालेले सर्व खेळाडू अनुभवी आहेत. टी २० सामने खेळण्याचा सर्वांना मोठा अनुभव आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ही स्पर्धा दुबईत होणार आहे. संघात निवड झालेल्या सर्व खेळाडूंना दुबईत खेळण्याचा चांगला अनुभव आहे त्यामुळे देशासाठी सर्वो त्तम कामगिरी करून भारताला पुन्हा एकदा आशिया करंडक जिंकून देण्याची जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील अशी आशा करूया. भारतीय संघाला टी २० आशिया करंडक स्पर्धेसाठी मनापासून शुभेच्छा!

## पूर ओसरला ..

ओसरला महा पूर
बाहेर पडले उंदीर
कुरतडावे इतस्ततः
झाले किती अधीर

कुठेपाणी कसे मुरे
शोधे फिरे भिरभिर
बोभाटा करा चला
प्रशासन नसे गंभीर

ऐकू येईना हाक ती
डोस्के झाले बधीर
जनतेचेनाही रे खरे
वक्तव्यां राहे खंबीर

एन डीआरएफवाले
जरी असो वक्तशीर
तरीही बोला ठासून
केला भलता उशीर

टिकाकार कैकअसे
बोलणा-यां दशशीर
घ्या फायदा संधीचा
आपण खायचीखीर

राजकारणी चालली
रे आंधळी कोशिंबीर
निमित्त मिळे चांगले
आगभडकवे महापूर

सोसतात निमुटपणे
नागरिक जर सधीर
नित्यकामकाज सुरु
कपाळा लावे अबीर

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो. ९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# उंटावरून शेळ्या हाकणे केव्हा बंद होईल?

आपण नेहमी पाहतो की बहुतांश क्षेत्रातील काही व्यक्ती उंटावरून शेळ्या हाकण्याचे काम करतात. ते इतके बेजबाबदारपणे वागतात की त्यांची कीव सुध्दा करावी वाटत नाही. उंटावरून शेळ्या हाकणारे लोक स्वतःला खूप चाणाक्ष आणि स्मार्ट समजतात. चारचौघांत त्यांचे बोलणे आणि वागणे एकदम वेगळे आणि अतिशयोक्तीने ठासून भरलेले असते. वासरात लंगडी गाय शहाणी ही म्हण सुध्दा त्यांना तंतोतंत लागू पडते. एकतर हे लोक स्वतः वाईट वागतात आणि दुसरीकडे त्यांची अशी धारणा असते की इतरांनी मात्र चांगले वागले पाहिजे. अशा विचित्र आणि दुटप्पी लोकांच्या वर्तनाकडे पाहिले की मनात विचार तरळतो, बापरे, अशा लोकांचे उंटावरून शेळ्या हाकणे केव्हा बंद होईल?

शेळ्या हाकणे म्हणजे शेळ्या राखणे हे काम वरवर पाहता साधे व क्षुल्लक काम वाटते.परंतु,शेळ्या हाकण्याचे काम फार जिकिरीचे असते.कारण शेळी हा प्राणी मेंढी प्राण्यांसारखा शिस्तबद्ध नाही. मेंढ्या राखणाऱ्याला जास्त कसरत करावी लागत नाही. एक मेंढी पुढे गेली की बाकीच्या मेंढ्या तिच्या मागे मागे जातात. शेळ्यांची जात म्हणजे उधळे प्राणीच. शेळ्या कळपात राहून कधीच चरत नसतात. शेळ्या चारही दिशांना एकसारखे पळत असतात. इथला पाला खाऊ की तिथला पाला, अशी हाव शेळ्यांना असते.जर शेळ्यांना शांत प्राणी ही उपाधी दिली तर तो शांत शब्दाचा घोर अपमान होईल. अशा प्राण्यांना उंटावर बसून हाकणे म्हणजे आणखी अवघड काम ठरते. कारण शेळी चपळ व वेगवान प्राणी आहे तर उंट हा मंद व कमी गतीने चालणारा प्राणी आहे. म्हणजे उंटावरून शेळ्या हाकणे म्हणजे कामाचा आणि कामाच्या गतीचा ताळमेळ नसणे असा आहे. मग कोणत्या क्षेत्रातील कोणते लोक उंटावर बसून शेळ्या हाकण्याचे काम करतात हे पाहणे महत्त्वाचे ठरते. प्रतेक तालुक्याच्या तहसील कार्यालयातील काही कर्मचारी निवडणूकीच्या काळात उंटावरून शेळ्या हाकण्याचे काम करतात. ते एका जागी बसून राहतात आणि निवडणूक कामाला नियुक्त झालेल्या इतर कार्यालयातील कर्मचाऱ्यांना नुसते आदेश देत राहतात. इकडे या, तिकडे जा, सही करा, निवडणूक साहित्य घ्या, मोजून बघा.शिक्षक, प्राध्यापक, अभियंते व इतर कार्यालयातील हे कर्मचारी तहसील कार्यालयातील सेवकालाही साहेब समजून आपले निवडणूकीचे काम करतात बिचारे! काही अधिकारी अरेतुरेची भाषा वापरून शिक्षकांना, प्राध्यापकांना दमदाटी करत निवडणूकीचे काम व्यवस्थित करायला सांगतात.

दवाखान्यात एका मोठ्या खुर्चीत बसलेला एक व्यक्ती स्वतः कोणतेच काम करत नाही. परंतु, इतर कर्मचाऱ्यांना आदेशावर आदेश देत राहतो.त्याचे आदेश ऐकून इतर आरोग्य कर्मचारी इकडून तिकडे जातात आणि तिकडून इकडे येऊन रुग्णांची देखभाल करतात. पण तो खुर्चीत ऐटीत बसलेला व्यक्ती खुर्चीतून कधीच उठत नाही आणि स्वतः कोणतेच काम करत नाही. हा व्यक्ती मोबाइलवर मात्र खूप व्यस्त असतो. म्हणजे उंटावरून शेळ्या हाकणे त्याला छान जमते. बँकेत गेल्यावर वेगळेच अनुभव येतात. तेथील सगळे कर्मचारी गंभीर चेहरे करुन बसलेले असतात. त्यांना काही विचारले की पलीकडे जा म्हणतात. पलीकडे गेले की तेथील काउंटरवरील कर्मचारी मध्यभागी असलेल्या कर्मचाऱ्याकडे जाण्यास सांगतात. त्याच्याकडे गेले की तेथून तो मॅनेजर कडे पाठवतो. म्हणजे नुसती टोलवाटोलवी सुरू असते. खरे कोणी सांगत नाही. आणि छोट्या कामासाठी मनस्ताप सहन करावा लागतो. समाजातही काही महाभाग उंटावरून शेळ्या हाकण्याचे काम करतात. सामाजिक कार्यक्रमामध्ये हे लोक स्वतः काही करत नाहीत आणि जे समाजबांधव समाजासाठी चांगले काम करतात त्यांना काही चुकीचे सांगून समाजकार्याचा बट्ट्याबोळ करतात. प्रत्येक क्षेत्रात असे काही नोकरदार असतात जे उंटावरून शेळ्या हाकत असतात.अशा या लोकांमुळे चांगल्या कामात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे इतरांना त्याचा मानसिक त्रास सहन करावा लागतो. म्हणून मनात विचार येतो की उंटावरून शेळ्या हाकणाऱ्या व्यक्तींना सुबुद्धी मिळो आणि त्यांचे हे कार्य कायमचे बंद पडो हीच शुभकामना!

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर.**

# राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व जिल्हास्तरीय उपक्रमशील शाळा पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२०, बार्शी (सोलापूर) :** ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शी ता.बार्शी जि.सोलापूर ही एक शासन नोंदणीकृत संस्था असून सामाजिक,शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे. सदर संस्थेच्या वतीने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे शिक्षक आणि उपक्रमशील शाळांचा सन्मान शिक्षक दिनानिमित्त दरवर्षी केला जातो. याही वर्षी ५ सप्टेंबर २०२५ शिक्षक दिनानिमित्त राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार आणि जिल्हास्तरीय आदर्श उपक्रमशील शाळा पुरस्कार देण्यात येणार आहेत. सदर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी शासन मान्यता प्राप्त प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांकडून पुरस्कारासाठी प्रस्ताव मागवण्यात येत आहेत. तसेच सोलापूर जिल्ह्यातील जिल्हास्तरीय उपक्रमशील शाळा पुरस्कारासाठी शासन मान्यता प्राप्त शाळांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सदर प्रस्ताव ऑफलाइन आणि ऑनलाईन पीडीएफ स्वरूपामध्ये सादर करता येणार आहेत. हे प्रस्ताव दि.२० सप्टेंबर २०२५ पर्यंत सादर करावेत. हा पुरस्कार सोहळा दिनांक २८ सप्टेंबर २५रोजी सकाळी १० वाजता

अमृत नाना राऊत यांच्या माऊली लॉन्स, रेल्वे स्टेशन रोड बार्शी जि. सोलापूर येथे संपन्न होणार आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल वाणी मो.नं. ९४२३०८७०२० व संस्थेचे सदस्य प्रा. डॉ.चंद्रकांत उलभगत मो. नं.९८५०४८७७४० शिक्षक व शाळांनी प्रस्ताव पाठवण्यासाठी वरील दोन मोबाईल नंबरवर संपर्क साधून वेळेत प्रस्ताव पाठवावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे.

**पत्ता** - राहुल वाणी, श्रीराम निवास, वाणी प्लॉट, आगळगाव रोड,बार्शी जि. सोलापूर पिनकोड-१४१३४०१

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

**✻ टी.सी. हरवली आहे ✻**
राहुल भगवान वाळके रा.सारखाणी, ता.किनवट जि.नांदेड याची टी.सी. दि.१८/०८/२०२५ रोजी सारखाणी ते किनवट मार्गावर एसटी बसमध्ये प्रवास करताना हरवली आहे.
सदरील टी.सी. कोणाला सापडल्यास पुढील नंबरवर संपर्क साधावा.
**राहुल भगवान वाळके**
**मोबा.७४९९७७६७८५**

# थोडक्यात

## शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बुलडाणा येथे गोकुळाष्टमीचा कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, बुलडाणा :** श्री. शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बुलडाणा येथे नुकताचगोकुळाष्टमीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान श्री.कावरे व प्रमुख उपस्थितीमध्ये शाळेचे माजी प्राचार्य श्री.आखाडे, प्रभारी पर्यवेक्षक श्री.राजपूत, एसएससी प्रमुख श्री.वाघ, जूनियर कॉलेज प्रमुख श्री.भोंडे उपस्थित होते. गोकुळाष्टमीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वर्ग पाच ते बाराच्या विद्यार्थ्यांनी समूह नृत्यमध्ये भाग घेऊन या उत्साहात सहभागी झाले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडण्यासाठी मनोरे स्पर्धेच्या मार्फत दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना गोपालकाला वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.ढोमणे यांनी केले व आभार प्रदर्शन श्री.राजपूत यांनी केले. कार्यक्रमाला श्री.शिवाजी विद्यालय बुलडाणा येथील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## लासलगाव ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांचा शिबिरास उत्तम प्रतिसाद



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** सिविल हॉस्पिटल नासिक, लासलगाव ग्रामीण रुग्णालय व जिल्हा परिषद नाशिक आरोग्य विभागातर्फे लासलगाव येथे बुधवार, दि.२० रोजी घेतलेल्या शिबिरास उत्तम प्रतिसाद मिळाला. लासलगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी बाळकृष्ण अहिरे यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे दंतशील्य चिकित्सक उपजिल्हा निफाड रुग्णालय येथील डॉ.कविता कदम तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.राजेंद्र बागुल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.चारुदत्त शिंदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुजित कोशिरे, स्त्री रोग तज्ञ डॉ.निलेश लाड याचे मोलाचे सहकार्य लाभले आणि उपस्थित रुणाच्या डोळ्यांच्या तपासणी, मौखिक, स्तन, गर्भाशय, कर्करोग, दंतरोग, स्त्रीरोग, तज्ज्ञ कडून तपासणी मोफत करण्यात आली. लासलगाव वैद्यकीय अधिकारी बाळकृष्ण अहिरे व लासलगाव ग्रामीण रुग्णालय येथील कर्मचाऱ्यांनी सिविल हॉस्पिटल नासिक व जिल्हा परिषद आरोग्य विभाग नाशिक यांचे मोलाचे सहकार्य मिळाल्याने आभार व्यक्त केले.

## शाळेत जाताना लहानग्यांच्या अंगावर कोसळले झाड
## चिखली येथील घटना; ४ मुले जखमी

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१९, सातारा :** चिखली, ता.सातारा येथे शाळेत निघालेल्या लहानग्यांच्या अंगावर झाड कोसळल्याने ४ शालेय मुले जखमी झाली आहेत. त्यांना तात्काळ उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून एकाचा हात थोडा मोडला असून उर्वरित तीन जणांच्या खांद्याला तसेच खुब्याला मुकामार लागला आहे.याबाबत मिळालेली माहिती अशी, दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास सातारा तालुक्यातील ठोसेघर, चिखली येथील आयुष विकास बोरगे इयत्ता ७ वी, वय १२, आर्यन चंद्रकांत शिर्के इयत्ता ५ वी, वय ११, समर्थ दीपक शिर्के इयत्ता पहिली वय ६, जय संपत शिर्के इयत्ता सातवी वय १२ ही शालेय मुले नेहमीप्रमाणे चिखली येथील जिल्हा परिषद शाळेत जाण्यासाठी निघाली होती. शाळेपासून जवळपास २०० मीटर अंतरावर असताना अचानक रस्त्याकडेला असणारे उंबराचे झाड या विद्यार्थ्यांच्या अंगावर कोसळले. त्यामुळे एकच खळबळ उडाली. स्थानिकांनी या मुलांना बाहेर काढून उपचारासाठी सातार्यात क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. यातील आर्यन चंद्रकांत शिर्के या विद्यार्थ्याचा हात थोडा मोडला असून झाड अंगावर आल्याने सर्वांच्या खांद्याला आणि खुब्याला मुकामार लागला आहे. तहसिलदार, सर्कल यांना या घटनेची माहिती मिळताच ते घटनास्थळी पोहचले आहेत.याबाबत बोलताना स्थानिकांनी सांगितले, चिखली याठिकाणी संरक्षक भिंत बांधण्याचे काम सुरु आहे. त्यासाठी चर काढल्यामुळे झाडांच्या मुळ्या उघड्यावर पडल्या आहेत. त्यातूनच ही दुर्घटना घडल्याची शक्यता आहे.

## मराठा क्रांती मोर्चा पाटण यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२०, पाटण (सातारा) :** पाटण तालुक्यात सर्वात जास्त कुणबी नोंदी आढळल्या आहेत. यात बऱ्याचश्या नोंदी मोडी लिपीत असल्याने ते दाखले लाभार्थींना कसे लवकरात लवकर देता येतील याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष द्यावे. अशी मागणी मराठा क्रांती मोर्चा समितीचे समन्वयक यशवंत (बाबा) जगताप, गणेश नायकवडी यांनी जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्याकडे केली आहे. जिल्हाधिकारी संतोष पाटील हे पूरपरिस्थितीची पाहणी करण्याकरिता पाटण दौऱ्यावर आले असता मराठा क्रांती मोर्चा समितीचे पाटण तालुका समन्वयक यशवंतराव (बाबा) जगताप, गणेश नायकवडी यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन मराठा क्रांतीचे समन्वयक व तहसिल कार्यालय यांच्या कुणबी नोंदीच्या मोडीतील वाचन व लिप्यांतरण बाबत जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केली. यावेळी पाटणचे उपविभागीय अधिकारी सोपान टोम्पे तहसीलदार अनंत गुरव यांनी कुणबी समाजाला दाखले मिळावे. म्हणून सर्वतोपरी सहकार्य करत आहेत. अनेक दाखले त्यांनी वितरित केले आहेत. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचा फायदा झाला आहे. मोडी लिपीतील दाखले लवकरात लवकर विद्यार्थ्यांना कसे मिळतील याकडे लक्ष द्यावे. यावेळी आपण उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्याशी चर्चा करून नक्कीच लोकांच्या व विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले.

# भीमा नदीला १ लाख ४६ हजाराचा विसर्ग



## नदीकाठच्या नागरिकांना सतर्कता बाळगावी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२०, पंढरपूर :** उजनी व वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामधील सततच्या पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी उजनी धरणातून ९१ हजार ६०० क्यूसेक्स तर वीर धरणातून ५४ हजार ७६० क्यूसेक्स असा एकूण १ लाख ४६ हजार ३६० क्यूसेक्स इतका विसर्ग सोडण्यात आल्याने नदीकाठच्या नागरिकांना सतर्कता बाळगावी, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.बुधवार, दि.२० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३ वाजता संगम येथून १ लाख २० हजार ६९५ क्सूसेक्सने पाणी वाहत आहे.

तर चंद्रभागा नदी पात्रातून ६० हजार २४७ क्सूसेक्सने पाणी वाहत आहे.उजनी व वीर धरण घाटमाथ्यावरील पावसाच्या प्रमाणानुसार व धरणामध्ये येणाऱ्या पाण्याच्या आवक (खपषश्रु) नुसार विसर्गामध्ये अजून वाढ होण्याची शक्यता आहे. त्यानुषंगाने, नदीपात्रालगत पूरस्थिती निर्माण होवून सखल भागातील नागरी वस्तीमध्ये मध्ये पूराचे पाणी शिरण्याची शक्यता आहे. तसेच पाणी पातळी वाढत असल्याने पंढरपूर तालुक्यातील ८ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे पाण्याखाली जाण्याची शक्यता असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने नीरा व भीमा नदी काठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी. भीमा व नीरा नदीमधून मोठ्या पाण्याचा विसर्ग सुरु झालेला आहे. त्यामुळे नदीतील कोल्हापूर पद्धतीचे सर्वच बंधारे पाण्याखाली जाणार आहेत. बंधारे पाण्याखाली गेलेल्यावर बॅरेकेट लावून वाहतुकीसाठी बंद करावेत. अशा सूचना तलाठी, ग्राम सेवक, पोलीस पाटील यांना दिलेल्या आहेत.

**नगरपालिका प्रशासन सज्ज**

उजनी व वीर धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी भीमा नदीला उजनीतून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु झालेला आहे. त्यामुळे शहरातील चंद्रभागा नदीकाठच्या भागातील नागरिकांनी सुरक्षेबाबत दक्षता घ्यावी. तसेच पूर परिस्थितीत आवश्यक उपाययोजना करण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली. तसेच नगरपालिका प्रशासनामार्फत उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथील रायगड भवन येथे एक हजार नागरिकांना राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच बाधित होणाऱ्या नागरिकांच्या जीवनावश्यक वस्तू नेण्यासाठी नगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत वाहनांची व्यवस्था करण्यात आली असून स्थलांतरित करण्यात येणाऱ्या नागरिकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व स्वयंसेवी संस्थेमार्फत भोजन व्यवस्था करण्यात येणार असल्याचेही मुख्याधिकारी श्री. रोकडे यांनी सांगितले.

# अतिवृष्टीग्रस्तांना तातडीने नुकसान भरपाई घ्या - आमदार दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील अनेक भागांना पूर्वीच्या पावसामुळे अतिवृष्टीचा मोठा फटका बसला असून रस्ते, मोटारपूल, बंधारे, तलाव आणि पायाभूत सुविधा यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार काशिनाथ दाते यांनी तातडीने पुढाकार घेत राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची मुंबईतील देवगिरी निवासस्थानी भेट घेत आपत्ती निवारण निधीमधून आर्थिक मदतीची मागणी केली आहे. तसेच मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनाही त्यांनी यासंदर्भात निवेदन दिले आहे.

सदर प्रस्तावानुसार विविध विभागांकडून एकूण ११७.१५ कोटींच्या निधीची मागणी करण्यात आली असून यात सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद, मृदू व जलसंधारण विभाग, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन तसेच जलसंपदा विभागाचाही समावेश आहे. ग्रामीण भागातील जनतेप्रती उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची असलेली आत्मीयता आणि महायुती सरकारची सकारात्मक भूमिका लक्षात घेता, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीवर तातडीने उपाययोजना होऊन लवकरात लवकर मदत पोहोचेल, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो, असे आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले.

**सरकारची सकारात्मक भूमिका**

राज्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्व भागांचे प्रस्ताव तपासले जात असून, लवकरच कॅबिनेट बैठकीत निधी वितरणाचा निर्णय घेतला जाईल. नुकसानग्रस्तांना तातडीने मदत करण्याची तयारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दर्शवली आहे.

**– आ.काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

# जलजीवन तपासणी अहवाल १० दिवसांत देण्याचे आदेश; नियुक्त पथकाकडून चौकशी सुरू



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** जलजीवन मिशन कार्यक्रमातील पाणीयोजनांच्या तपासणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या दोन पथकांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी येत्या महिनाअखेरपर्यंत तपासणी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. योजनांच्या सद्यस्थिती सह त्रुटी व जबाबदारी निश्चितीचा उल्लेख अहवालात करण्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

जलजीवन मिशनमधील पाणीयोजनांच्या कामाबाबत लोकप्रतिनिधींसह स्थानिक पातळीवरील सरपंचांनीही तक्रारी केलेल्या आहेत. सीईओ भंडारी यांनी सूत्रे स्वीकारल्यानंतर आतापर्यंत त्यांच्याकडे किमान ३० योजनांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या तपासणीसाठी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता हितेंद्र चव्हाण व उपकार्यकारी अभियंता सुधीर आरळकर अशी दोन स्वतंत्र पथके नियुक्त करण्यात आली आहेत. या पथकाने तपासणी सुरू केली आहे. सहा योजनांचे तपासणी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सादर करण्यात आले आहेत.

तपासणी करताना पथकाने योजनेचा ठेकेदार, गावातील सरपंच, ग्रामस्थ यांनाही समवेत घ्यायचे आहे. काही किरकोळ त्रुटी व अपूर्ण कामे आढळली, तर लगेच संबंधित ठेकेदारांमार्फत पूर्ण करून घेण्याचे आदेश दिले आहेत. या तपासणीत जलवाहिन्यांची कामे योग्य पद्धतीने झाली का, पाण्याची टाक्याची गळती, वाहिन्यांची गळती, पाणी पूर्ण दबाने मिळते का, अंदाजपत्रकात समावेश असलेल्या सर्व घरांना पाणीपुरवठा होतो का, पाईप योग्य पद्धतीने गाडले गेले का अशा प्रकारे तपासणी करण्यास सांगण्यात आले आहे.

दोन्ही पथकांनी आतापर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केलेल्या सहा ते सात अहवालांत त्रुटी आढळल्या आहेत. त्यात योजनांच्या सद्य:स्थितीचा उल्लेख आहे. मात्र त्रुटी व त्या पूर्ण करण्याची जबाबदारी कोणावर याचा उल्लेख नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अहवालात त्रुटींचा व जबाबदारी निश्चितीचा उल्लेख करण्याचे आदेश दिले आहेत.

**जलजीवन मिशन योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यात ८३० पाणी योजनांपैकी २७४ योजना पूर्ण झाल्या आहेत. त्यात २५ टक्क्यांपर्यंत ४ योजनांची कामे झाली. ५० टक्क्यांपर्यंत २७ योजनांची, ७५ टक्क्यांपर्यंत १२० योजनांची, तर ९९ टक्के काम पूर्ण झालेल्या ४०५ पाणीयोजना आहेत. २७४ योजनांमध्ये सर्वाधिक योजनांची कामे संगमनेर व पारनेर या दोन तालुक्यात प्रत्येकी २९ योजना पूर्ण झाल्या आहेत. तर सर्वात कमी योजना पाथर्डी तालुक्यात, केवळ ७ योजना पूर्ण आहेत. श्रीरामपूरमध्ये ९ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. घरोघरी नळजोड योजनांची संख्या १२६९ असून त्यापैकी ६१३ गावांमध्ये नळजोडणीची कामे पूर्ण झाली आहेत. त्यात २५ टक्क्यांपर्यंत २२,५० टक्क्यांपर्यंत १९२,७५ टक्क्यांपर्यंत २२०, तर २२२ गावांमध्ये ९९ टक्के नळजोडणीची कामे झाली आहेत.**

# कोयना धरणात १०१.४७ टीएमसी पाणीसाठा

## पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी कोयनेतून ९५300 क्युसेकचा पाण्याचा विसर्ग

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२०, सातारा :** कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाऊस वाढल्यामुळे धरणातील पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी कोयना धरणाचे सहा वक्र दरवाजे १२ फुटांवरून १३ फुटापर्यंत उघडून ९५,३०० क्युसेक विसर्ग कोयना नदीपात्रात सोडण्यात आले आहे. कोयना धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता १०५.२५ टीएमसी असून बुधवार, दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वा. पर्यंत १०१.४७ टीएमसी इतका पाणीसाठा झाला आहे. कोयना धरण ९३.६६ टक्के भरले आहे. जिल्ह्यातील इतर धरणांची आज रोजी सकाळी ९ वा.पर्यंतची स्थिती पुढीलप्रमाणे आहे.धोम धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता १३.५० टीएमसी असून १३.१८ टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९७.८५ टक्के धरण भरले आहे. धरणातून १७२७४ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

धोम-बलकवडी धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता ४.०८ टीएमसी असून ३.८२ टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९७.७९ टक्के धरण भरले आहे, धरणातून ७३२९ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

कण्हेर धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता १०.१० टीएमसी असून ९.५७ टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९६.९३ टक्के धरण भरले आहे, धरणातून १४८२३ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

उरमोडी धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता ९.९६ टीएमसी असून ९.७२ टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९८.२९ टक्के धरण भरले आहे, धरणातून ८९३६ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

तारळी धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता ५.८५ टीएमसी असून ५.४५ टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९४.२८ टक्के धरण भरले आहे, धरणातून ४४३५ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

वीर धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता ९.८३ टीएमसी असून ९.५० टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९६.५० टक्के धरण भरले आहे, धरणातून ५५८८७ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

सातारा जिल्ह्यात पावसाचा वाढता जोर असून धरण पाणलोट क्षेत्रात आज दि.२० ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत झालेला पाऊस व एकूण पाऊस मिलीमीटरमध्ये पुढीलप्रमाणे कोयना- २७० मिमी. (३९२८ मि.मी.), नवजा ३८७ मिमी. (४८२२ मि.मी.),महाबळेश्वर ३०८ मिमी. (४५०८ मि.मी.),धोम ४७ मिमी.( ५६१ मि.मी.), धोम बलकवडी १९७मिमी. (२२३७ मि.मी.), कण्हेर ४९ मिमी. (६९० मि.मी.), उरमोडी ६२ मिमी.( १२१७ मि.मी.),तारळी ६० मिमी.(१३३६ मि.मी.), वीर १४ मिमी.( २१० मि.मी.)

# कोयना धरणाचे दरवाजे १२ फुटांवर ! पाटण तालुक्यातील सर्वच नद्यांना पूर...

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२०, पाटण :** कोयना धरणाच्या छत्रपती शिवाजी महाराज जलाशय पाणलोट क्षेत्रातील नवजा या ठिकाणी २४ तासात ५२४ मि.मी विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. पाऊस प्रचंड वाढल्यामुळे धरणातील पाणीपातळी झपाट्याने वाढत असताना प्रतिसेकंद ९१,२७१ क्युसेक पाण्याची आवक येत आहे. पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी कोयना धरणाचे वरील सहा वक्र दरवाजे सायंकाळी ६ वा. ११ फुटांवरून १२ फुटांवर उघडून नदीपात्रात प्रतिसेकंद ८९,१०० क्युसेक एवढ्या प्रचंड पाण्याचा विसर्ग सोडण्यात येत आहे. दरम्यान पाटण तालुक्यातील तारळी, उत्तर मांड, गुरेघर, वांग मराठवाडी, चिटेघर ही धरणे पूर्ण क्षमतेने भरले असून सर्वच धरणातून नदीपात्रात विसर्ग सुरू आहे. यामुळे पाटण तालुक्यातील सर्वच नद्या दुथडया भरून वाहत आहेत.

कोयना नदीवरील हेळवाक, नेरळे, मुळगाव पुल पाण्याखाली गेले आहेत. हेळवाक बाजार पेठ व पाटण शहरातील नवीन एस.टी. स्टॅण्ड, कळके चाळ मुळगाव रस्ता येथे पाणी घुसले आहे. पावसाचे वाढते प्रमाण पहाता धरणातील पाणी साठा १०० टिएमसीच्या वर झाला आहे. शक्यता भासल्यास धरणातून पाण्याचा विसर्ग वाढविला जाणार आहे. यामुळे नदीकाठावरील गावातील नागरिकांना त्वरित स्थलांतरित होण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच कराड, सांगली या शहरांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तर पावसाचे वाढते प्रमाण पहाता पाटण तालुक्यातील शाळा, महाविद्यालयांना दोन दिवस सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.



**भूस्खलन होण्याची शक्यता...**

पाटण तालुक्यात बहुतांश गावे डोंगर दऱ्याखोऱ्यात आहेत. पावसाचे प्रमाण प्रचंड असून तालुक्याच्या पश्चिम भागात संततधार सुरू आहे. जमीनींना मोठ्या प्रमाणात पाझर, उफळे फुटले आहेत. यामुळे जमीन भूस्खलन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मागील परिस्थिती पहाता पाटण तालुक्यात भूस्खलन होण्याचे प्रमाण जास्त आहे.

ज्या गावातील घरे डोंगर उतारावर व डोंगर पायथ्याशी आहेत अशा गावातील नागरिकांनी सुरक्षतेची काळजी घेऊन सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे. असे वाहन करण्यात आले आहे.

पावसाच्या या वाढत्या प्रमाणामुळे कोयना धरणात पाण्याची आवक वाढली असून प्रतिसेकंद ९१,२७१ हजार क्युसेक पाणी येत आहे. यामुळे धरणातील पाणी साठा १०० . ४० टिएमसी वर झाला आहे. धरणाचे वरील सहा वक्र दरवाजे १२ फुटांवर उचलून ८७,००० क्युसेक तर पायथा विद्युतगृहातून २१०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे नदीपात्रात एकूण ८९,१०० क्युसेक एवढ्या प्रचंड पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

मागील २४ तासात म्हणजे सोम वारी सायंकाळी ५ वा ते मंगळवारी सायंकाळी ५ वा. पर्यंत कोयना- ३२७ मि.मी (एकूण- ३७९३) नवजा- ५२४ मि.मी (एकुण- ४६४३) महाबळेश्वर- २३६ मि.मी (एकुण- ४२८५) एवढी नोंद झाली आहे. पाण्याचा वाढत्या प्रवाहामुळे नागरिकांनी नदीपात्रात उतरण्याचा प्रयत्न करु नये. पावसाचे वाढते प्रमाण पहाता आवश्यकता वाटल्यास धरणातून नदीपात्रातील पाण्याचा विसर्ग वाढविला जाईल असे धरण व्यवस्थापना कडून सांगण्यात आले आहे. यासह नदीकाठावरील गावांसह कराड, सांगली या शहरांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान एलिव्हेटेड रोड उभारणार

- पुणे-लोणावळा उपनगरीय रेल्वे मार्गावर तिसरी व चौथी मार्गिका.
- एमयूटीपी अंतर्गत मुंबईसाठी नवीन २६८ एसी रेल्वे गाड्यांची खरेदी.
- ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान एलिव्हेटेड रोड.
- मेट्रो मार्गिका ११ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला हिरवा कंदील.
- नागपुरात नवनगर तयार करण्यास मान्यता.




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, ठाणे :** राज्यातील वाहतूक आणि शहरी विकासाच्या दृष्टीने म हत्त्वाच्या ठरणाऱ्या अनेक प्रकल्पांबाबत निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत घेण्यात आले. या निर्णयांमुळे मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई आणि नागपूर या शहरांना आधुनिक वाहतूक व्यवस्था आणि विकासाची नवी दिशा व गती मिळेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

बैठकीत पुणे-लोणावळा या उपनगरीय रेल्वे मार्गावर तिसरी व चौथी मार्गिका उभारणीस मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे पुणे-लोणावळा कॉरिडॉर अधिक सक्षम होणार असून त्या परिसरातील औद्योगिक, निवासी व व्यावसायिक विकासाला आवश्यक ती कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. तसेच पुणे शहरातील वाढत्या ट्रॅफिकचा ताण कमी करण्यासही यामुळे मदत होईल. याचबरोबर पुणे मेट्रोच्या टप्पा-१ अंतर्गत बालाजीनगर-बिबवेवाडी व स्वारगेट-कात्रज या दोन नवीन स्थानकांना मंजुरी देण्यात आली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

उपनगरीय रेल्वे सेवेत आधुनिकता आणण्यासाठीही मुंबई महानगर प्रदेश विकास योजनेच्या (एमयूटीपी) टप्पा ३ व ३ए अंतर्गत नवीन गाड्यांची खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. पहिल्या टप्प्यात तब्बल २६८ पूर्ण एसी गाड्या खरेदी होणार आहेत. या गाड्या मेट्रोप्रमाणेच बंद दरवाज्याच्या, उच्च दर्जाच्या सोयी-सुविधांनी सज्ज असतील. जुन्या विना-दरवाजाच्या गाड्यांना टप्प्याटप्प्याने हटवून त्याऐवजी या आधुनिक गाड्या प्रवाशांना उपलब्ध करून दिल्या जातील. विशेष म्हणजे तिकीट दरांमध्ये कोणताही बदल होणार नसल्याचेही मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितले. केंद्र सरकारच्या मान्यतेनंतर ट्रेनची खरेदी सुरू होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

ठाणेकर आणि नवी मुंबईकरांसाठीही महत्त्वाची पायाभूत सुविधा उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळादरम्यान २५ किलोमिटर लांबीचा एलिव्हेटेड रोड उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे ठाणे, नवी मुंबई आणि मधल्या औद्योगिक क्षेत्रांना वेगवान व समर्पित दळणवळण मार्ग उपलब्ध होणार आहे.

मुंबईत मेट्रो मार्गिका ११ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला हिरवा कंदील मिळाला आहे. वडाळा डेपो ते गेटवे ऑफ इंडिया या १६ किलोमीटर लांबीच्या पूर्ण भूमिगत मार्गिकेची उभारणी करण्यात येणार आहे. श्यामाप्रसाद मुखर्जी चौक व हॉर्निमन सर्कल अशा महत्त्वाच्या ठिकाणांवरून ही मेट्रो धावेल. जवळपास ₹२४,००० कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून, जपानच्या आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेकडून (जायका) यासाठी निधी उपलब्ध होणार आहे. या मार्गिकेमुळे म ुंबईकरांना वाहतुकीत मोठा दिलासा मिळेल. तसेच बेस्टसोबत संयुक्त विकास प्रकल्पांतर्गत व्यावसायिक कॉम्प्लेक्स उभारला जाणार असून, त्यातून बेस्टला अतिरिक्त उत्पन्न मिळणार आहे. त्याचबरोबर नागपूरमध्येही विकासाचे नवे दालन उघडणार आहे. शहरात नवीन रिंग रोड उभारणीस तसेच नागपुरात एक नवनगर तयार करण्यास मान्यता देण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन म ुश्रीफ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मुख्य सचिव राजेशकुमार तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# खा.बजरंग सोनवणे केंद्रीय मंत्री अमित शहांच्या भेटीला

## बीड जिल्ह्यातील संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी केंद्राकडे केली मदतीची मागणी

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२०, बीड :** बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून पाऊस जोरदार हजेरी लावत असून जिल्ह्याम धील बहुतेक सर्वच महसुल मंडळाम धे अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. शेतातील पिके पाण्यात आहेत. दोन दिवसांपुर्वी खा.बजरंग सोनवणे यांनी थेट शेतात जावून नुकसानीची पाहणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेवून अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून मदतीचा हा द्या, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

बीड जिल्ह्यातील शेतकरी बांधवांवर अतिवृष्टीमुळे मोठे संकट ओढावले आहे. राहती घरे, पीक, पशुधन, शेतीजमीन तसेच फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून तातडीने मदत मि ळावी, यासाठी खा.सुप्रिया सुळे यांच्या सोबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात संततधार आणि मुसळधार पावसाची नोंद झालेली असून जिल्ह्यातील नद्यांना पूर गेलेला आहे. नदीपात्रापासून एक किलोमीटर अंतरापर्यंत पिके पाण्याखाली आहेत.

पावसामुळे पिकांचे, शेतीचे आणि घरांची पडझड होवूनही मोठी हानी झालेली आहे. केज तालुक्यातील काही गावात मांजरा नदीच्या पात्रातील पाणी शिरले होते. या पाण्यामुळे मोठ्या प्रम ाणात पिकांचे आणि शेतीचेही नुकसान झाले होते. यानंतर तातडीने खा.बजरंग सोनवणे यांनी पूर्वनियोजीत दौरा रद्द करून शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जावून पिकांची आणि नुकसानीची पाहणी केली होती. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांनी धीर दिला होता. यानंतर मुख्यमंत्री आणि कृषीमंत्री यांना निवेदन पाठवून पंचनामे करणे व मदतीची म ागणी केली होती.



आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केंद्र सरकारच्या वतीने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी केली. दरम्यान, गेल्या ४/५ दिवसांपासून झालेल्या संततधार पावसामुळे बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्रच शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उपजाऊ मातीसह जमीन वाहून गेल्यामुळे पुढील काळासाठी काही क्षेत्र उजाड झाली आहेत. काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे तसेच गुरे दगावले असल्याची माहिती येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. झालेल्या नुकसानीचे फोटो व व्हिडिओ स्वत:कडे जतन करून ठेवावेत, तसेच नुकसानीबाबतची तक्रार फोटो, व्हीडिओसह तहसीलदार यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करावी. या प्रक्रियेत कुठलीही अडचण आल्यास माझ्या कार्यालयाशी संपर्क साधून मदत घ्यावी, असे अवाहनही खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक यांना केले आहे.

# थोडक्यात

## मुदखेड येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक संपन्न



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२०, मुदखेड (नांदेड) :** बुधवार, दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक ओमकार गार्डन मंगल कार्यालयात प्रदेश सचिव दादाराव पा.ढगे यांच्या नेतृत्वाखाली या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित) जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगांवकर यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला नांदेड जिल्ह्यांतील मुखेड तालुक्यांत झालेल्या अतिवृष्टीत मृत्यू पावलेल्यांना सर्व प्रथम भावपुर्ण आदरांजली देण्यात आली. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले आहे की, पक्षात काम करीत असताना नविन जुने गट-तट करू नका पक्षवाढीसाठी काम करा तळागाळातील कार्यकर्त्यापासुन ते पदाधिकाऱ्यांपर्यंत सर्व जन एक जुटीने काम केलात तर आगामी जिल्हा परिषद निवडणूक ग्रामपंचायत निवडणूक आणि नगर परिषद निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवल्या शिवाय राहणार नाही. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका व शहर कार्यकारणी बरखास्त करण्यात येत आहे आणि लवकरच नवीन कार्यकारणी निवड करण्यात येईल असे रावणगावकर यांनी आढावा बैठकीत सांगीतले. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव दादाराव पाटील ढगे यांच्यासह पक्षाचे पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. पण या बैठकीला पदाधिकारी सोडले तर तालुकाध्यक्षानी निष्ठावंत कार्यकर्त्यांनी व ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनी या आढावा बैठकीकडे पाठ फिरवली असल्याचे दिसून आले.

## अल्पवयीन बालिकेवर ४२ वर्षीय नराधमाचा अत्याचार; आरोपी अटकेत



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. २०, भद्रावती (चंद्रपूर) :** भद्रावती तालुक्यातील मुधोली गावात ११ वर्षीय अल्पवयीन बालिकेवर ४२ वर्षीय नराधमाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली

मिळालेल्या माहितीनुसार, गोपीचंद आत्राम (वय ४२, रा. मुधोली) याने अल्पवयीन बालिकेवर अत्याचार केला. घटनेच्या वेळी पीडितेचे आईवडील शेतात कामासाठी गेलेले असल्याने ती घरी एकटी होती. ही संधी साधून आरोपीने तिच्या घरात घुसून अत्याचार केला. संध्याकाळी आईवडील घरी आल्यानंतर मुलीने त्यांना संपूर्ण प्रकार सांगितला. त्यानंतर तातडीने भद्रावती पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली. पोलिसांनी तत्पर कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास भद्रावती पोलीस स्टेशनचे ठाणेदार योगेश्वर पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय केदारे व पीएसआय मुळे करीत आहेत.

## सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर बल्लारपूर पोलिसांचा रूट मार्च

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर शहरात येणाऱ्या पोळा, तान्हापोळा, गणेश उत्सव तसेच ईद-ए-मिलाद या सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि नागरिकांमध्ये विश्वास व सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी पोलिस विभागाकडून भव्य रूट मार्च काढण्यात आला. या रूट मार्चमध्ये पोलीस निरीक्षक यांच्यासह ७ अधिकारी व ५० अंमलदार सहभागी झाले होते. संपूर्ण रूट म ार्चदरम्यान पोलिसांचे शिस्तबद्ध पथक तैनात होते. शहरातील नागरिकांनी ठिकठिकाणी रूट मार्चचे स्वागत केले. हा रूट मार्च दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ४.३० वाजता (१६/३०) पोलिस ठाणे बल्लारपूर येथून सुरू झाला. नगर परिषद चौक, रेल्वे चौक, जुना बस स्टॅन्ड, फॉरेस्ट गेट, गौरक्षण वॉर्ड अशा प्रमुख व गजबजलेल्या मार्गावरून हा रूट मार्च काढण्यात आला. त्यानंतर परतीच्या मुख्य मार्गाने जात सायंकाळी ६ वाजता (१८/००) पोलिस ठाणे बल्लारपूर येथे याचा यशस्वी समारोप करण्यात आला. पोस्टे बल्लारपूरचे पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. आगामी सण काळात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, तसेच नागरिकांनी निर्धास्तपणे सण साजरे करावेत, यासाठी पोलिस प्रशासन सदैव सज्ज असल्याचा संदेश या रूट मार्चमधून देण्यात आला.

## सद्भावना दिवस सामूहिक प्रतिज्ञा घेत नमुंमपा मुख्यालयात स्व.राजीव गांधी यांस अभिवादन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२०, नवी मुंबई :** सद्भावना दिवसानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे सद्भावना प्रतिज्ञा घेत माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, सहा.आरोग्य अधिकारी डॉ.रत्नप्रभा चव्हाण, लेखाधिकारी विजय रांजणे व दयानंद कोळी, अतिक्रमण विभागाचे सहा.आयुक्त अरूण पाटील, विधी अधिकारी अभय जाधव, इस्टेट मॅनेजर अशोक अहिरे यांच्या समवेत उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी सद्भावना दिवस प्रतिज्ञा ग्रहण केली.

मी अशी प्रतिज्ञा करतो / करते की, मी जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता, सर्व भारतीय जनतेच भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करीन. मी आणखी अशी प्रतिज्ञा करतो/करते की, आमच्यामधील सर्व प्रकारचे मतभेद मी हिंसाचाराचा अवलंब न करता विचार विनिमय करून व संविधानिक मार्गाने सोडवीन अशा प्रकारची सद्भावना दिवस प्रतिज्ञा याप्रसंगी उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी घेतली.